# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ४५० /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- २२/०८/२०१८

## " आर्थिक फसवणुक झालेल्या गुंतवणुकदांना आवाहन"

भंडारा :- जनतेची दिवसेंदिवस होणारी आर्थिक फसवणुकीच्या गुन्हयात वाढ होत असल्याचे निदर्शनास आल्याने मा. पोलीस अधिक्षक, भंडारा श्रीमती विनीता साहू यांनी जनतेस आपले पैसे गुंतवणुक करातांना खबरदारी घेण्याबाबतचे आवाहन केले आहे.

भंडारा जिल्हात आर्थिक फसवणुकीच्या तसेच वित्तीय घोटाळयांच्या गुन्हयामध्ये वाढ होत असुन जिल्हा पोलीस अभिलेखावर अनमोल, यालको, मैत्री, शेप महाबचत गट, जेएसव्ही, एसजेएसव्ही, सुर्यांशी पोर्टफोलीओ, जागृती अॅग्रो फुडस्, सावित्रीबाई फुले पत संस्था अशा बोगस कंपन्यांनी अक्षरशः जनतेची लाखो रूपयांनी फसवणुक करून लुट केलेली असुन जिल्हयात बॅक घोटाळे, वित्तीय पत संस्था मधिल गैरव्यवहाराचे प्रमाण वाढलेले आहे. जनता सुध्दा कमी कालावधीत दामदुप्पटीच्या आशेने अशा फसवणुक करणाया कंपन्यामध्ये पदरमोड करून पैसे गुंतवणुक करतात व गोरगरीब जनतेच्या कष्ठाचे पैशाची लुट विविध बोगस कंपन्याद्वारे होत आहे.

करीता उपरोक्त कंपन्या व पत संस्थांवर फसवणुक केल्याबाबतचे गुन्हे नोंद असुन आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा येथे तपासावर आहेत. तरी संबंधीत कंपन्यांमध्ये गुंतवणुकदारांनी गुंतविलेल्या पैशांचे प्रमाणपत्राबाबत आर्थिक गुन्हे शाखा, भंडारा येथे आपल्या प्रमाणपत्रासह बयाण नोंदविण्याकरीता येण्याबाबत गुंतवणकदारांना आवाहन करण्यात आले आहे.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष; भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.